As per provisions of Maharashtra self-finance School (establishment and regulation) Act 2012 giving permission to start new self-financed school or upgrading existing school for academic year 2017-18

Government of Maharashtra

School Education and Sports Department

GR no SFS-1017/File no 219/SM-2

Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk

Secretariat Mumbai-400032

Dated 7th June 2017

**Foreword-**

1. Audyogik Tantra Shikshan Sanstha Chinchwad Tal-Haveli Dist.-Pune has submitted its proposal for permission of City Pride School Chikhali Tal-Haveli Dist.-Pune. The permission of school was under consideration of Government of Maharashtra.

**Government Resolution**

2.1 As per provisions of Maharashtra Self finance School (establishment and regulation) act 2012 (01 of 2013) government has granted permission to Audyogik Tantra Shikshan Sanstha's (Chinchwad Tal-Haveli Dist.-Pune) City Pride School Chikhali Tal-Haveli, Dist.-Pune from Primary to Higher Secondary (Grade 1 to 12th all streams English Medium CBSE) from academic year 2017-18 with condition to comply with following terms and conditions-

2.2 **Terms and Conditions**

1. Deputy Director should verify that school has not started before the grant of permission by government. If the school has started before obtaining permission from government then concerned deputy director should impose penalty of Rupees One lac to the school and submit the report about the same.
2. The said school should abide and follow provisions of RTE 2009 and rules and regulations under the same.

VIKRAM B. DESHMUKH
ADVOCATE, PUNE
Regd No. MAH/2149/1999

Scanned with Oken Scanner

3. We hereby issue letter of intent to school management to start school for academic year 2019-20 and comply with terms and conditions as per rules 2009

a) As per rule prescribed in RTE rules 2009 School management should apply for grant of recognition to concerned district education officer within one months' time from beginning of academic year.

b) If school management has not complied with all the terms and conditions as prescribed in rules for establishment of schools then they should comply with same and start school within 18 months from the date of GR of permission. Otherwise the permission will stand cancelled automatically.

c) As per comprehensive policy described in Government resolution of 2012 school should obtain recognition before getting NOC for CBSE affiliation. School can apply for obtaining NOC after getting the said recognition from District Education officer Primary/Secondary/Education Inspector BMC as per paragraph 10 in government resolution. The government will issue NOC to school after scrutiny of said application.

4. The school has to abide to i) rules and regulations prescribed in GRs published by government ii) Provisions of Maharashtra Self-financed School (establishment and regulation) act 2012, (01 Of 2013)

5. The concerned appropriate officer should grant recognition after verification of completion all the conditions mentioned in rules 2009.

6. School cannot change medium, location of school mentioned in permission in future. If management starts school at any other location than mentioned in this permission for whatsoever reason, permission will stand cancelled automatically.

7. U-DISE data-It is responsibility of school management to register the school got grant of permission/up-gradation through this GR under "Government recognised self -financed School" and obtain U-DISE number. To complete this formality state has designated State Project Director, Maharashtra Prathmik Shikshan Parishad Mumbai as nodal officer. School management should put board "Government

VIKRAM B. DESHMUKH
ADVOCATE, PUNE
Reg.No. MAH/2149/1999

Scanned with Oken Scanner

recognized Self-financed School" outside its gate for information of concerned people.

8. School should follow all the rules and regulations prescribed by state for recruitment of teaching and non-teaching staff.

3. It is responsibility of concerned deputy director to inform the government resolution of permission of school the management.

As per order and in the name of Governor

(Signed and stamped by)

Santosh Gaikwad
Upper Secretary
Maharashtra Government

Copy marked to

1. Commissioner Education Pune
2. State Project Director, Maharashtra Prathmik Shikshan Parishad
3. Director Education (Secondary and Higher Secondary) Maharashtra State
4. Director Education (Primary) Maharashtra State
5. Deputy Director Pune
6. Education officer Primary/Secondary ZP Pune
7. SM-2

VIKRAM B. DESHMUKH
ADVOCATE, PUNE
Reg.No. MAH/2149/1999

Scanned with Oken Scanner

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.२१९/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ७ जून, २०१७

प्रस्तावना -

१. औद्योगिक तंत्र शिक्षण संस्था, चिंचवड, ता.हवेली, जि.पुणे संचलित सिटी प्राईड स्कूल चिखली, ता.हवेली, जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत औद्योगिक तंत्र शिक्षण संस्था, चिंचवड, ता.हवेली, जि.पुणे संचलित सिटी प्राईड स्कूल चिखली, ता.हवेली, जि.पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळेस (इ. १ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, सी.बी.एस.ई.) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळा सुरु करण्यास खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(६) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित

तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)